loknayak 28.11.2026:Copy of Layout 1 11/27/2026 11:08 PM Page 1

बीड ।जालना। छत्रपती संभाजीनगर । पुणे । अहमदनगर,सोलापूर,नागपूर,यवतमाळ → आर. एन. आय. एमएएच /एमएआर / २०१४/ ५८०९० → शनिवार दि २८ नोव्हेंबर २०२६ → वर्ष १० वे → अंक -१३२ → पाने ४+४ → किंमत २ रु

Beed /Jalna/ Chatrapati Sambhajinagar / pune / Ahamadnagar → RNI : Regd.No.MAHMAR/2014/58090 → Saturday Date: 28 November 2026 → 10 th Year → 132 Paper → Pages : 8 → Price - 2 Rupees

महाराष्ट्राचा महानायक

लोकनायक

संपादक – भारत गायकवाड

प्राध्यापकाच्या गैरवर्तनाने विद्यार्थिनी त्रस्त!

मेडीकलच्या विद्यार्थिनींचा प्राध्यापकाकडून लैंगिक छळ; शिवाजीनगर पोलिसांत तक्रार, आरोपी डॉक्टर अटकेत

वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, बीड शहरातील एका होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापकावर विद्यार्थिनींनी लैंगिक छळ व मानसिक त्रास दिल्याचे गंभीर आरोप केले आहेत. परीक्षेत नापास करण्याची धमकी देणे, तपासणीच्या बहाण्याने गैरवर्तन करणे आणि वारंवार त्रास देणे, अशा स्वरूपाच्या तक्रारी विद्यार्थिनींनी केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी आरोपी डॉक्टर अनिस अहमद यांना अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.



प्राध्यापकाच्या गैरवर्तनाने विद्यार्थिनी त्रस्त!

तपासणीच्या बहाण्याने गैरवर्तन, परीक्षेत नापास करण्याची धमकी दिल्याचा आरोप; शिवाजीनगर पोलिसांची कारवाई, आरोपी डॉक्टर अटकेत

लोकनायक वृत्तसेवा – महाविद्यालयात द्वितीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या २२ वर्षीय विद्यार्थिनीने प्राध्यापकाविरोधात तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार, संबंधित प्राध्यापकाने तपासणीच्या बहाण्याने गैरवर्तन केल्याचा आरोप असून, त्याला विरोध केल्यास परीक्षेत नापास करण्याची धमकी दिल्याचे विद्यार्थिनीने म्हटले आहे.

याच प्रकारामुळे विद्यार्थिनी मानसिक दबावाखाली असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.याच महाविद्यालयातील अन्य विद्यार्थिनीनेही संबंधित प्राध्यापकाविरोधात तक्रार केल्याचे वृत्त आहे. तपासणीच्या नावाखाली गैरवर्तन तसेच विरोध केल्यास धमकावल्याचा आरोप तिने केला आहे.

विशेष म्हणजे, मागील काही महिन्यांपासून वारंवार अशाच प्रकारचा त्रास होत असल्याचा आरोप विद्यार्थिनींकडून करण्यात आला आहे.

विद्यार्थिनींनी धाडस दाखवत शिवाजीनगर पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविल्यानंतर पोलिसांनी प्रकरणाची दखल घेत गुन्हा दाखल केला आणि आरोपी डॉक्टर अनिस अहमद यांना अटक केली. वैद्यकीय शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रात विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेबाबत निर्माण झालेल्या या प्रश्नामुळे परिसरात चिंता व्यक्त होत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास शिवाजीनगर पोलिसांकडून करण्यात येत आहे.

मुख्यमंत्री पशूधन योजनेचा शुभारंभ झाला पण वेबसाईटच बंद



लोकनायक वृत्तसेवा – मोठा गाजावाजा करत मुख्यमंत्री पशूधन योजनेचा शुभारंभ काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. शुभारंभ झाल्यानंतर लगेच ऑनलाईन अर्ज दाखल करता येईल, असे पशुसंवर्धन विभागाकडून घोषीत करण्यात आले होते, मात्र कालपासून ते आज दुपारपर्यंत वेबसाईट बंद दाखवत होती. एक वर्षापुर्वी घोषणा केलेल्या मुख्यमंत्री पशुधन उद्योजक योजनेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल करण्यात आला. योजनेचा शुभारंभ झाल्यानंतर लगेच ऑनलाईन अर्ज दाखल करता येईल, असे पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून सांगितले गेले होते, तसे पोर्टलदेखील तयार केल्याचे सांगितले होते. मात्र कालपासून ते आज दुपारपर्यंत वेबाईट सुरू होत नव्हती. लोकांची दिशाभूल करण्यासाठी तर योजना जाहीर केली नाही ना असा प्रश्नही उपस्थित हाऊ लागला.

जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षकांचा वाळूमाफियांना दणका!

बीड जिल्ह्यात वाळू माफियांची खैर नाही; आणखी एका वाळूमाफियावर एमपीडीए अंतर्गत कारवाई, हर्सूल कारागृहात रवानगी

बीड (लोकनायक वृत्तसेवा) : बीड जिल्ह्यात अवैध वाळू व्यवसाय करणाऱ्यांविरोधात प्रशासनाने कठोर कारवाईचा बडगा उगारला असून, आणखी एका वाळूमाफियावर महाराष्ट्र प्रतिबंधात्मक स्थानबद्धता कायद्यांतर्गत (एमपीडीए) कारवाई करण्यात आली आहे. गेवराई तालुक्यातील महारटाकळी येथील सरफराज राजू पठाण (वय ३०) याच्याविरोधात स्थानबद्धतेचा प्रस्ताव चकलंबा पोलिसांनी पोलिस अधीक्षक बीड यांच्या माध्यमातून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केला होता. या प्रस्तावाला जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी २६ नोव्हेंबर २०२६ रोजी मंजुरी दिल्यानंतर २७ नोव्हेंबर रोजी संबंधित आरोपीला ताब्यात घेऊन छत्रपती संभाजीनगर येथील हर्सूल कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले. सरफराज राजू पठाण याच्याविरोधात गौण खनिज वाळूची चोरी करणे, वाळूचा साठा करणे, वाळूची वाहतूक करणे, गौण खनिज कायद्याचे उल्लंघन तसेच मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन अशा गंभीर स्वरूपाचे चार गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांच्या प्रेस नोटमध्ये नमूद करण्यात आले आहे. अवैध वाळू व्यवसायाशी संबंधित गुन्हेगारी कारवायांना आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून ही कारवाई करण्यात आली आहे.ही कारवाई पोलिस अधीक्षक नवनीत कावत (भापोसे), अपर पोलिस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलिस अधिकारी गेवराई अनिल कटके आणि पोलिस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सहाय्यक पोलिस निरीक्षक सचिन इंगळे, पोलिस **पान २ वर**



शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

प्रो.सागर गायकवाड मो.9860145412
सागर
ग्लास हाऊस
आमच्याकडे सर्व प्रकारचे विन्डोज,डोअर, ॲल्युमिनियम पार्टीशनची कामे केली जातील तसेच लॅमिनेशन डोअर सनमाइक डोअर फायबर डोअर सागवन डोअर योग्य भावत तयार करुण मिळतील.
पत्ता: श्री संत सावतामाळी चौक कृष्णामंदीर रोड बीड

॥ सस्नेह निमंत्रण ॥
बीड सिटीझन
नूतन मुख्य कार्यालयाचा
भव्य उद्घाटन सोहळा
सप्रेम नमस्कार,
आपणास कळविण्यास अत्यंत आनंद होत आहे की,आपल्या सर्वांच्या सहकार्याने आणि शुभेच्छांनी
'सायं. दै. बीड सिटीझन' च्या नूतन मुख्य कार्यालयाचा भव्य उद्घाटन सोहळा शनिवार, दि. २८ नोव्हेंबर २०२६ सकाळी ०९:०० वाजता संपन्न होत आहे. तरी या मंगलप्रसंगी आपण उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, ही नम्र विनंती.
:उद्घाटक:
संघर्षयोद्धा मा.श्री.
मनोजदादा जरांगे पाटील
विशेष उपस्थिती:
मा.आ.श्री.विजयसिंहराजे पंडित साहेब
(गेवराई विधानसभा मतदारसंघ)
श्रीमती प्रेमलताताई पारवे
(नगराध्यक्षा, नगर परिषद बीड)
● वार व दिनांक - शनिवार, दि. २८ नोव्हेंबर २०२६
● वेळ - सकाळी ठिक ०९:०० वाजता
● स्थळ - सायं. दै. बीड सिटीझन मुख्य कार्यालय, बीएसएनएल टॉवर समोर, बशीरगंज, बीड.
आपले विनीत-
शेख मुजीब खाजा (संपादक - सायं. दै. बीड सिटीझन)
सायं.दै.सिटीझन परिवार,बीड

सस्नेह निमंत्रण
नगरपंचायत वडवणी जि.बीड
प्रशासकीय इमारतीचा
उद्घाटन सोहळा
वार: शनिवार दिनांक २८.११.२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. या शुभमुहूर्तावर करण्याचे योजिले आहे,तरी आपण उद्घाटन समारंभास उपस्थित रहावे हि नम्र विनंती.
शुभहस्ते
मा.आ.श्री.प्रकाशदादा सोळंके साहेब
(आमदार माजलगाव विधानसभा)
विशेष अतिथी
मा.श्री.विवेक जॉन्सन साहेब
(जिल्हाधिकारी,बीड)
कार्यक्रमाचे अध्यक्ष
सौ.वंदनाताई शेषेराव जगताप
(नगराध्यक्ष,वडवणी)
प्रमुख उपस्थिती
मा.श्री.संभाजी वाघमारे
(सह.आयुक्त,न.पं.प्रशासन बीड)
प्रमुख पाहुणे
मा.श्री.जयसिंगभैय्या सोळंके (माजी सभापती जि.प.बीड)
मा.श्री.राजाभाऊ अण्णा मुंडे (माजी नगराध्यक्ष,वडवणी)
मा.श्री.सहाल भैय्या चाऊस (नगराध्यक्ष,माजलगाव)
मा.श्री.बालासाहेब जाधव (नगराध्यक्ष,धारूर)
मा.श्री.संभाजी शिंदे (सभापती कृ.उ.बा.स.वडवणी)
मा.श्री.बजरंग साबळे (तालुका अध्यक्ष,रा.काँ.पा.वडवणी)
मा.श्री.बन्सीभाऊ मुंडे (उपनगराध्यक्ष,वडवणी)
मा.श्री.सर्जेराव आळणे (माजी जि.प.सदस्य)
मा.श्री.विकास मुंडे (तालुका अध्यक्ष रा.यु.काँग्रेस,वडवणी)
मा.श्री.अंकुशभाऊ शिंदे (जेष्ठ नेते)
मा.श्री.अस्लम कुरेशी (गटनेते तथा सभापती)
मा.श्री.नवनाथराव म्हेत्रे (माजी जि.प.सदस्य)
मा.श्री.गंपुशेठ पवार (माजी सरपंच)
मा.श्री.महादेव दादा उजगरे (तालुका अध्यक्ष,रिपाई)
सर्व सन्माननिय सभापती,नगरसेवक
सौ.रंजना नागनाथ डिगे (सभापती),सौ.मिरा सुधिर ढोले (सभापती),सौ.मिनाक्षी संभाजी शिंदे, सौ.मंगल राजाभाऊ मुंडे, सौ.द्रोपदी भगवान वाघमारे,श्री.देविस्थ (सचिन) शिवराम सानप, सौ.किस्किंदा दिनकरराव आंधळे,श्री.गिन्यानदेव वालू राठोड, सौ.महताबी अब्दुलरौफ पठाण, सौ.मिरा भिमराव उजगरे, सौ.नेहा नागेश आळणे,श्री.हरिदास किसनराव टकले, सौ.रूपिका विनय नहार, सौ.उषा उत्तम घाडगे, श्री.गुरूप्रसाद लक्ष्मण माळवदे, श्री.अरूण सुरेश मुंडे
विनीत
श्री.पोपट नानासाहेब निगळ
(मुख्याधिकारी,न.पं.वडवणी)
व सर्व अधिकारी,कर्मचारी वृंद
लोकसेवेसाठी नवे वाहन.. वडवणीच्या विकासाला नवी दिशा...
NAGAR PANCHAYAT WADWANI
भोजन वेळ
कार्यक्रमानंतर लगेचच
● स्थळ : नगरपंचायत प्रशासकीय इमारत,बाजारतळ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,वडवणी जि.बीड ●

loknayak 28.11.2026:Copy of Layout 1 11/27/2026 11:08 PM Page 2

पाण्यावरील वीजनिर्मिती थांबवा, दुष्काळ हटेल



आटपाडी – पाण्यावरील वीजनिर्मिती थांबवल्यास उपलब्ध होणाऱ्या ज्यादाच्या शेकडो टीएमसी पाण्याने असंख्य तालुक्यातील दुष्काळ कायमचा हटेल . असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे ओबीसी, अल्पसंख्याक, वंचित उपेक्षितांचे राज्याचे नेते सादिक खाटीक यांनी व्यक्त केले आहे . सध्याच्या भीषण दुष्काळाच्या परिस्थितीवर कायम स्वरूपी मात करणेसाठी केंद्र आणि राज्याचे सरकारकडे काही उपाय – सुचना करीत असल्याकडे सादिक खाटीक यांनी, प्रथमतः स्पष्ट करत माजी मंत्री, आमदार जयंतराव पाटील, माजी मंत्री, आमदार विश्वजीत कदम, खासदार विशालदादा पाटील, आमदार सुहासभैय्या बाबर, आमदार रोहीतदादा आर आर आबा पाटील यांचे याकडे निवेदनाद्वारे लक्ष वेधल्याचे सादिक खाटीक यांनी स्पष्ट केले . पाण्याची पुनर्निमिती करता येत नाही . पाण्यालाही नैसर्गिक मर्यादा आहे . हे लक्षात घेतले पाहिजे . वीज निर्मितीसाठी कोळसा, अणु उर्जा, सौर उर्जा, पवन उर्जेचे पर्याय उपलब्ध आहेत . म्हणून वीज निर्मितीसाठी वापरानंतर समुद्राला सोडून दिले जाणारे शेकडो टीएमसी पाणी वाचविण्यासाठी त्या शेतकऱ्यांच्या आणि जमीन नसेल त्या कुटुंबाचा, प्रत्येकी ५००० घनमीटर पाण्यावर हक्क प्रस्थापित केला गेला पाहिजे . समन्यायी तत्वाने पाण्याचे समान वाटप केले पाहिजे . बंदिस्त पाईपलाईननेच पाणी शेतापर्यंत ेले पाहिजे . उघड्या पाण्याचे होणारे प्रचंड बाष्पीभवन टाळून प्रचंड सौर उर्जा मिळिवण्यासाठी प्रत्येक तलाव, धरणाच्या पाण्याच्या किमान ७५ टक्के भागावर सौर उर्जा प्रकल्प राबविले पाहिजेत . हजारो तलाव, मोठे प्रकल्प, धरणांमधील निम्म्याने साठलेला प्रचंड गाळ काढून पडीक जमीन सुपिक बनविली पाहिजे . या सर्व मानवनिर्मित भांड्यांची (तलाव धरणे) स्वच्छता झाल्याने प्रत्येक तलाव, धरणाच्या पूर्ण क्षमतेइतके पाणी उपलब्ध होणार आहे . मोठ मोठ्या नद्यांचे महापुराचे पाणी, प्रचंड व्यासाच्या बंदिस्त भुयारी मार्गाने अनेक दुष्काळी तालुक्यांच्या जमिनीखाली २०० – ३०० फुटापर्यत नेले पाहिजे . महापुराचे पाणी दुष्काळी तालुक्या पर्यतच्या भुयारी पाईपलाईनने गेल्यास पाण्याचा प्रचंड प्रवाह कमी होऊन नद्यांच्या काठचा सधन भाग पुराच्या पाण्यापासून सुरक्षित होणार आहे . आणि दुष्काळी तालुक्यांना अंडर ग्राऊंडचे जिरविण्यासाठी प्रचंड प्रमाणात उपाय योजना केल्या पाहिजेत . सांगली जिल्ह्यातील खुजगांव येथे १५० टीएमसी क्षमतेचे नवे धरण करणे शक्य होत असल्यास ते तातडीने केले पाहिजे . कोयना धरणा सारख्या राज्यातल्या अनेक धरणांच्या उंची वाढवून वाढीव शेकडो टीएमसी पाणी मिळिवता येत असेल तर ते तातडीने वास्तवात आणले पाहिजे . दुष्काळामध्ये शेतीशिवाय इतरत्र काम करणारे कष्टकरी मजुर, शेतमजुर पुरुष आणि स्त्रियांची मोठी होरपळ होत असते . काम नसलेने आणि पाणी टंचाईने यांचे जगणे कमालीचे दयनीय बनते. दुष्काळाच्या काही महिन्यात, दुष्काळात होरपळणाऱ्या प्रत्येक कुटुंबात माणसांच्या संख्येवर आर्थिक मदत केली पाहिजे . उत्तम दर्जाचे धान्य, कडधान्ये, डाळी, पामतेलाची भेसळ नसलेले गोडेतेल वगैरे अत्यंत गरजेच्या जीवनाश्यक वस्तू स्वस्त धान्य दुकानातून मोफत वितरीत केल्या पाहिजेत . राज्यातील – देशातील शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्यावर तातडीने निर्बंध आणले पाहिजे . जनावरांसाठी आणि माणसांच्या पिण्यासाठी सध्या दिल्या जाणाऱ्या प्रमाणाच्या दुप्पट प्रमाणात पाणी देण्याचे नवे धोरण स्विकारले पाहिजे . कर्मचारी – अधिकाऱ्यांना हाताशी धरून, इप्सित स्थळी पाणी न टाकताच अनेक खेपांचे पैसे ढापणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, टॅंकर मालक, चालकांवर कडक कारवाईची अंमलबजावणी केली पाहिजे . चारा छावण्या, चारा डेपो ऐवजी गायी, म्हैशी, बैल, घोडे गाढवे वगैरे मोठ्या जनावरांच्या संख्येवर तसेच शेळ्या – मेंढ्या वगैरे लहान जनावरांच्या संख्येवर पशुपालक – शेतकऱ्यांना त्यांच्या बँक खात्यावर रोख अनुदान दिले पाहिजे . हायड्रोपोनिक तंत्राने बंदिस्त शेडमध्ये चारा तयार करण्यासाठी सरकारने लाखो शेतकऱ्यांना भरीव अनुदान आणि गरजेपुरते पाणी उपलब्ध करून देऊन उभे केले पाहिजे . या तंत्राने १ किलो मक्या सारख्या बियापासून ७ – ८ दिवसात किमान ८ ते ९ किलो प्रत्येक प्रत्येक ट्रे मध्ये चारा उपलब्ध होऊ शकतो . हा चारा ओला, लुसलुसीत आणि पोषक तत्वांनी परिपूर्ण असल्याने जनावरे उत्तमरित्या पोसली जातात . दुष्काळी स्थितीवर मात व्हावी म्हणून हायड्रोपोनिक चारा तयार करण्यासाठी सधन भागातल्या आणि नदी काठच्या लाखो शेतकऱ्यांना शासनाने राज्यकर्त्यांनी तयार केले पाहिजे . आणि हा तयार होणारा संपूर्ण चारा दुष्काळी भागात गावोगावी आपल्या खर्चाने शासनाने प्रत्येक पशुपालकाला उपलब्ध करून दिला पाहिजे . पाण्याची बेसुमार होणारी हेळसांड टाळण्यासाठी सर्वांचे प्रबोधन करणारी सर्व माध्यमातून युद्ध पातळीवरून राबविली पाहिजे . देशातील सर्व व्यवस्थां मधील व्यापारी, व्यावसायिक, उद्योजक, शासकीय, निमशासकीय, सहकार, कंपन्या मधील बॉटम टू टॉपच्या अधिकारी कर्मचारी पर्यतच्या सर्वांकडून दुष्काळ निवारण निधी म्हणून एक महिन्याचा पगार सक्तीने घेतला पाहिजे . देशस्तरावर राज्यस्तरावर शेती आणि शेती पुरक व्यवसाय यावर आधारीत सर्व संपन्न स्वतंत्र अर्थसंकल्प मांडला जावा . देशाच्या – राज्याच्या बजेटच्या २५ टक्के तरतुद या शेतीच्या अर्थसंकल्प–द्वारे शेतीसाठी केली पाहिजे . शक्तीपीठ सारखे अनाठायी लाखो कोटी रुपये खर्चाचे प्रकल्प रद्द करून हाच पैसा पाणी संवर्धनासाठी उपयोगात आणला पाहिजे . सर्व धर्माच्या धार्मिक स्थळांमध्ये, भारतीय बजेटच्या १८ पट पैसा जमत असल्याचे जानकारांचे मत आहे . शिवाय वेगवेगळ्या मार्गाने जप्त केली जाणारी अवैध संपत्ती आणि धार्मिक स्थळामधील किमान १७ पट पैसा देशासाठी शासनाने ताब्यात घेतला पाहिजे . या धार्मीक स्थळातील व जप्त केलेल्या संपत्तीतून देशातील प्रत्येक विभागाचा किमान २० पटीने सर्वांगीण आणि चौफेर विकास होईल . २० पट उपलब्ध होणाऱ्या पैशाने पावसाचा प्रत्येक थेंब अनब थेंब अडवणे आणि योग्यरित्या सत्कारणी लावणे शक्य होणार आहे . उपलब्ध होणाऱ्या २० पट पैशापैकी काही पट पैशाने, समुद्राचे पाणी प्रक्रिया करूनचे स्वच्छ, निर्जंतुक पिण्यायोग्य देशभर फिरविणे आणि हिमालयातील बर्फाचे अनाठायी वाहून जाणारे पाणी सर्व देशभर वापरात आणता येणे सहज शक्य होणार आहे . हे सर्व शक्य झाल्यास भारत पुढची शंभर – दीडशे वर्षे पाण्याच्या संकटापासून सुरक्षीत होऊ शकेल . याशिवाय दुष्काळ हा शब्दच इतिहासजमा होईल . तसेच भारत जगाचे नेतृत्व करणारी महासत्ता म्हणून पुढे आल्याशिवाय राहणार नाही . कृषीप्रधान असलेल्या भारतात शेतकरी राजाची कमालीची दुरावस्था संपविण्यासाठी सर्व बाजुनी अप्रत्यक्ष – प्रत्यक्षरित्या झालेले दुर्लक्ष अक्षम्य आहे . शेतकरी हा देशाचा कणा आहे . देशाची लाईफ लाईन आहे . याचा विसर पडल्यानेच बहुतांश शेतकऱ्यांची अवस्था *मागतकरी पोतराजा* सारखी झाली आहे . यावर तातडीने मार्ग काढण्यासाठी *दुष्काळावर निर्णायक उपाययोजना केली पाहिजे . तसेच पाण्यावरील वीजनिर्मिती थांबवली पाहिजे, तर अन तरच दुष्काळ कायमस्वरूपी नेस्तनाबुत होईल.* केंद्र आणि राज्य सरकारने वर सुचविलेले सर्व उपाय प्रत्यक्षात आणावेत . यासाठी आपण आपल्या पदाचा वापर करून जोरदार आवाज उठवावा . असे ही सादिक खाटीक यांनी शेवटी म्हंटले आहे .

जाहीर नामा

श्रीमती एम.एस. कुलकर्णी न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग केज ता. केज जि. बीड यांच्या न्यायालयात

कि. फौ.अ.नं.५४८/२०२६

उत्रेश्वर विरुध्द ग्रामविकास अधिकारी मस्साजोग ता. केज जि.बीड

प्रकरण कलम १३ (३) जन्म मृत्यु कायद्या अन्वये. ज्यापेक्षा अर्जदार उत्रेश्वर पि. दिलीपराव देशमुख वय ४४ वर्षे, धंदा –शेती रा.मस्साजोग ता. केज जि.बीड यांनी त्यांचा मुलगा नामे शिवम पि. उत्रेश्वर देशमुख याचा जन्म मौजे मस्साजोग ता. केज जि.बीड येथे दि.२३.०७.२०१२ रोजी झाला असुन अर्जदाराच्या मुलाची जन्माची कायदेशीर नोंद असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदाराच्या मुलाचे कायदेशीर जन्माचे दिनांकास कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिण्याचे आत त्याने या कोर्टात हजर राहुन आपल्या हारकती कळवाव्यात आणि या लेखावरच असे कळिवण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य हारकती न दाखवल्या तर कोर्ट सदरहुन अर्जदार यांच्या हक्का बद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क साबीत झाल्यास सदरहुन जन्माचे प्रमाणपत्र कायदेशीर असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल.

पुढील तारीख २१.०१.२०२७

आज ता. माहे नोव्हेंबर सन २०२६ रोजी माझे सहिनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिली.

क. लिपीक

आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक प्रथमवर्ग
न्यायदंडाधिकारी न्यायालय केज ता. केज जि.बीड

जाहीर नामा

श्रीमती पि.व्ही. चव्हाण न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग केज ता. केज जि. बीड यांच्या न्यायालयात

कि. फौ.अ.नं.५६२/२०२६

बाबासाहेब विरुध्द ग्रामविकास अधिकारी मस्साजोग ता. केज जि.बीड

प्रकरण कलम १३ (३) जन्म मृत्यु कायद्या अन्वये.

ज्यापेक्षा अर्जदार बाबासाहेब पि. गोपिनाथ कदम वय ६२ वर्षे, धंदा –शेती रा. मस्साजोग ता. केज जि.बीड यांनी अर्जदाराची मुलगी नामे स्वाती पि. बाबासाहेब कदम हिचा जन्म मौजे मस्साजोग ता. केज जि.बीड येथे दि. ३०.१०.१९९२ रोजी झाला असुन अर्जदाराच्या मुलीची जन्माची कायदेशीर नोंद असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदाराच्या मुलीचे कायदेशीर जन्माचे दिनांकास कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिण्याचे आत त्याने या कोर्टात हजर राहुन आपल्या हारकती कळवाव्यात आणि या लेखावरच असे कळिवण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य हारकती न दाखवल्या तर कोर्ट सदरहुन अर्जदार यांच्या हक्का बद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क साबीत झाल्यास सदरहुन जन्माचे प्रमाणपत्र कायदेशीर असल्या बाबतचे

प्रमाणपत्र देईल. पुढील तारीख ०७.०१.२०२७

आज ता. माहे नोव्हेंबर सन २०२६ रोजी माझे सहिनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिली.

क. लिपीक

आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक प्रथमवर्ग
न्यायदंडाधिकारी न्यायालय केज ता. केज जि.बीड

पान १ वरून

जिल्हाधिकारी व ...

उपनिरीक्षक गणेश कन्हाडकर, नरेंद्र बांगर, राहुल नांगरे, कैलास गुजर, सीमा वराडे, अर्जुन थापडे, अमोल सोनवणे तसेच चकलंबा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक अभिमन्यू औताडे व बिबीषण चव्हाण यांनी या कारवाईत सहभाग घेतला. दरम्यान, अवैध वाळू व्यापार करणारे, अवैध गुटखा विक्री करणारे, जातीय व धार्मिक तेढ निर्माण करणारे, दादागिरी व खंडणीखोरी करणारे धोकादायक गुंड, बेकायदेशीर जुगार, लॉटरी तसेच हातभट्टी दारू व्यवसाय चालविणाऱ्यांविरोधात यापुढे एमपीडीए व मोक्का कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांनी स्पष्ट केले आहे. बीड जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात प्रशासनाची कारवाई अधिक तीव्र होण्याचे संकेत या कारवाईतून मिळत आहेत.

पान ४ वरून

नगरपंचायतीच्या अत्याधुनिक टोलेजंग

...

उजगरे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच या सोहळ्याला नगरपंचायतीचे सर्व सन्माननीय सभापती व नगरसेवक उपस्थित राहणार आहेत. यामध्ये सभापती सौ.रंजना नागनाथ डिगे, सभापती सौ.मिरा सुधीर ढोले, सौ.मिनाक्षी संभाजी शिंदे, सौ.मंगल राजाभाऊ मुंडे, सौ.द्रौपदी भगवान वाघमारे, सचिन शिवराम सानप, सौ.किस्किंदा दिनकरराव आंधळे, गिन्यानदेव वालू राठोड, सौ.महताबी अब्दुलरौफ पठाण, सौ.मिरा भीमराव उजगरे, सौ.नेहा नागेश आळणे, हरिदास किसनराव टकले, सौ.रुपिका विनय नहार, सौ.उषा उत्तम घाडगे, गुरुप्रसाद लक्ष्मणराव माळवदे आणि अरुण सुरेश मुंडे यांचा समावेश आहे. तसेच शहरातील माजी नगरसेवक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी, विविध संस्थांचे प्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरिक आणि शहरवासीय मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी पोपट नानासाहेब निगळ तसेच नगरपंचायतीचे सर्व अधिकारी व कर्मचारी परिश्रम घेत आहेत. तरी या ऐतिहासिक लोकार्पण सोहळ्यास सर्व मान्यवर, नागरिक, हितचिंतक आणि वडवणीकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन नगरपंचायतीच्या वतीने करण्यात आले आहे. आजचा हा दिवस वडवणीकरांसाठी केवळ नव्या इमारतीच्या उदघाटनाचा नसून, शहराच्या प्रशासकीय विकासाला नवी दिशा देणाऱ्या एका महत्त्वपूर्ण पर्वाचा साक्षीदार ठरणार आहे! एकूणच, ६ कोटी ३० लाख रुपयांच्या निधीतून साकारलेली ही भव्य प्रशासकीय इमारत म्हणजे वडवणी शहराच्या विकासाची नवी ओळख ठरणार आहे. दिवंगत अजितदादा पवार यांच्या माध्यमातून मिळालेला निधी, आमदार प्रकाशदादा सोळंके यांचे प्रयत्न आणि शेषेराव बाप्पु जगताप यांचा अतिरिक्त निधीसाठीचा पाठपुरावा या सर्वांच्या योगदानातून ही वास्तू प्रत्यक्षात साकारली आहे. त्यामुळे या उदघाटन सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

डिघोळआंबा शिवारात अनोळखी व्यक्तीचा निघृण खून; ...

कापडाचे ठिगळ असलेली चड्डी आहे. कमरेला लाल रंगाचा करदोडा असून, त्यास काळ्या, पांढऱ्या व पोपटी रंगाच्या दोऱ्याने तीन चाव्या बांधलेल्या आहेत. मृतदेहाजवळ काळ्या रंगाच्या चामड्याच्या चपलांचा जोड (जोडे) आणि एका लाल चौकडीच्या रुमालात बांधलेले डेटॉल व मेडिमिक्स साबण आढळून आले आहेत.या वर्णनाच्या इसमाची ओळख पटविण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे यांनी केले आहे. या संदर्भात कोणतीही माहिती मिळाल्यास युसुफवडगाव पोलिसांशी ९७३०९३४४१४ किंवा ९२२५०९२८३७ या क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा, असे पोलिसांनी कळवले आहे.

भारतीय संविधान एकता,समता, बंधुता ....

यावेळी किसन तांगडे, शाहू डोळस, सुभाष तांगडे, भास्कर जावळे, भीमराव घोडेराव, कार्यक्रमाचे आयोजक मिठू वाघमारे, रमेश भिसे,कोंडीराम निकम(सरपंच), विनोद काशीद, विष्णुपंत करपे, राजाभाऊ निकम, शंकर निकम,भगवान निकम,साहेबराव शिंदे, भैय्या वाघमारे, बापू निकाळजे, शांतीलाल पवार, मोहन खेमाडे, भागवत साबळे, विजय ओहाळ, विनोद शेजवळ, राहुल कांबळे, विशाल गव्हाणे, दयानंद उबाळे, अविनाश अवघड, किशोर वाघमारे, सोपान वाघमारे, सचिन वाघमारे, अशोक वाघमारे, सौरभ वाघमारे, लक्ष्मी वाघमारे, रोहिणी वाघमारे, मनीषा वाघमारे, सुनीता वाघमारे, बापूसाहेब वाघमारे, रामदास भिसे, आकाश वाघमारे, तुषार वाघमारे आदी उपस्थित होते.

डॉ.श्रेया कांबळे यांना एफ.एम.जी.ई.परिक्षेत ..

जिद्द आणि चिकाटी उराशी बाळगून, आपल्या आईवडिलांचा विश्वास संपादन करुन त्यांचे स्वप्न साकार करण्यासाठी परदेशात जावुन वैद्यकीय क्षेत्रातून अल्पावधीतच अगदी भारतातील सर्वात कठीण असणाऱ्या परिक्षेत घवघवीत यश संपादन करुन देशा बरोबरच जिल्हा आणि केज तालुक्याचे नाव रोशन केले आहे.याबाबत अधिक माहिती अशी की केज शहरातील नामांकित असणाऱ्या

बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज येथील प्रोफेसर डॉ. महादेव कांबळे व जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील सहशिक्षिका श्रीमती नागम्मा टिळेकर यांची कन्या डॉ. श्रेया कांबळे हीचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण शिक्षण सेंट अँथनी इंग्लिश स्कूल अंबाजोगाई येथे झाले आहे. तर उच्च माध्यमिक शिक्षण लातूर या ठिकाणी झालेले आहे. तसेच एमबीबीएस ेह स्टेट गव्हर्मेंट युनिव्हर्सिटी क्रिगेस्थान येथे झाले आहे. एच एस सी८०+ एच एस सी ७९ एमबीबीएस ९० % त्यानंतर भारतीय मेडिकल बोर्ड (छएइएड) यांनी ३१ऑक्टोबर २०२६ रोजी एफएमजीई ही परीक्षा घेतली होती. या परीक्षेत त्या पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण झाल्या असून दिनांक २१ रोजी एन ई बी ई ए एम एम एस ने नुकत्याच घेतलेल्या परिक्षेचे गुणपत्रक जाहिर केले असुन त्यांनी पेपर क्रं.१ मध्ये ८० पेपर क्र.२ मध्ये ८४ असे गुण मिळवले असुन त्यांना एकुण गुण १६४ एवढे मिळाले आहेत.विशेष म्हणजे त्यांना इयत्ता पहिली पासुन एएमबीबीएस ईथपर्यंत एकाही वर्षांचा खंड नसुन एफ एम जी ई. ही अत्यंत कठीण पातळी असलेली परिक्षा त्या पहिल्याच प्रयत्नात यशस्वी झाल्या आहेत.

त्यामुळे त्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव माननीय रमेशरावजी आडसकर

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किर्दत सर प्रो. हिरवे सर आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी स्टाफ यांनी त्यांचे अभिनंदन केले असुन मित्र परिवार आणि आप्तेष्ट यांचे कडून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

loknayak 28.11.2026:Copy of Layout 1 11/27/2026 11:08 PM Page 3

जामखेड येथे नवीन नगरपरिषद कॉम्प्लेक्समध्ये घाणीचे साम्राज्य; कोट्यवधींचे गाळे धूळखात!

गाळ्यांचे तातडीने वितरण करा, स्वच्छता राखा; अन्यथा नगरपरिषदेला टाळे ठोकणार – प्रा. कुंडल राळेभात यांचा इशारा

लोकनायक वृत्तसेवा –
जामखेड शहरातील नगरपरिषदेसमोरील नवीन कॉम्प्लेक्स कोट्यवधी रुपये खर्च करून उभारण्यात आले असले, तरी या कॉम्प्लेक्समधील गाळ्यांचे अद्याप योग्य पद्धतीने वितरण झालेले नाही. दुसरीकडे, या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अस्वच्छता, घाणीचे साम्राज्य आणि गहाणीगिरी सुरू असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्यांकडून केला जात आहे. त्यामुळे नेमके या गाळ्यांमध्ये काय सुरू आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. बेरोजगार तरुणांना रोजगाराची संधी मिळण्याऐवजी कॉम्प्लेक्सची दुरवस्था होत असल्याने नगरपरिषद प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.यासंदर्भात जामखेड मुस्लिम पंच कमिटीचे अध्यक्ष अजहरभाई काझी यांनी सांगितले की, आमदार रोहित पवार यांच्या माध्यमातून अतिशय चांगल्या पद्धतीने हे कॉम्प्लेक्स उभारण्यात आले आहे. मात्र, नगरपरिषद प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे आज या ठिकाणी अस्वच्छतेचे साम्राज्य निर्माण झाले आहे. कॉम्प्लेक्समध्ये फिरून पाहणी केली असता ठिकठिकाणी घाण आढळून आली. याचा आजूबाजूच्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. एवढेच नव्हे,या कॉम्प्लेक्समध्ये सुमारे १२५ ते १५० गाळे उपलब्ध असून, त्यांचे पारदर्शक पद्धतीने वितरण केल्यास अनेक बेरोजगार युवकांना रोजगाराची संधी मिळू शकते.ज्यांचे पूर्वी व्यवसायासाठी येथे हक्काचे स्थान होते, त्यांचाही नियमानुसार विचार करून गाळ्यांचे वितरण करावे. नगरपरिषद प्रशासनाने तातडीने लक्ष घालून स्वच्छता व गाळे वितरणाचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी अजहरभाई काझी यांनी केली.



दरम्यान, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रा. कुंडल राळेभात यांनीही या कॉम्प्लेक्सच्या दुरवस्थेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की, जामखेड हे तीन जिल्ह्यांच्या सीमेवरील महत्त्वाचे शहर असून मोठ्या नगरपरिषदांमध्ये त्याची गणना होते. आमदार रोहित पवार यांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपये खर्च करून नगरपरिषदेसमोर भव्य कॉम्प्लेक्स उभारण्यात आले. मात्र, या इमारतीचे अद्याप योग्य पद्धतीने हस्तांतरण व गाळ्यांचे वितरण झालेले नाही. शहरात अनेक बेरोजगार तरुण व्यवसायाच्या प्रतीक्षेत असताना एवढे मोठे कॉम्प्लेक्स वापराविना पडून राहणे दुर्दैवी आहे.कॉम्प्लेक्सची पाहणी केली असता स्वच्छतागृहांची योग्य व्यवस्था नसल्याने उघड्यावर शौचालयाचा वापर होत असल्याचे दिसून आले. परिसरात घाण व दुर्गंधी पसरली असून, नगरपरिषद कार्यालयात अधिकारी व कर्मचारी ये-जा करीत असतानाही या समस्येकडे कोणाचे लक्ष नाही, ही गंभीर बाब आहे. नगरपरिषद प्रशासनाला या कॉम्प्लेक्सची स्वच्छता राखता येत नसेल, तर गाळ्यांचे वितरण आणि देखभाल कशी होणार, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.आमदार रोहित पवार यांच्या माध्यमातून हे कॉम्प्लेक्स उभारले असल्यामुळे त्याच्या वितरणात राजकारण केले जात आहे का? असा प्रश्नही प्रा. राळेभात यांनी उपस्थित केला. शहरातील दूध डेअरीपासून विविध ठिकाणची अतिक्रमणे हटविण्यात आली असून, अनेक व्यावसायिकांचे गाळे तुटल्याने त्यांचे व्यवसाय उघड्यावर आले आहेत. अशा परिस्थितीत नवीन कॉम्प्लेक्समधील गाळ्यांचे पारदर्शक पद्धतीने वितरण करून बेरोजगारांना व्यवसायाची संधी देणे आवश्यक आहे.या प्रश्नावर तहसीलदार व जिल्हाधिकारी यांना निवेदन देणार असून, सोमवारपर्यंत कॉम्प्लेक्सची स्वच्छता करून गाळे वितरणाबाबत योग्य कार्यवाही न झाल्यास जामखेड नगरपरिषदेला टाळे ठोकण्याचा इशारा काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रा. कुंडल राळेभात यांनी दिला आहे.
आता नगरपरिषद प्रशासन या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देऊन कॉम्प्लेक्सची स्वच्छता, गाळ्यांचे पारदर्शक वितरण आणि कथित
गहाण करणाऱ्यावर काय कारवाई करणार, याकडे जामखेडकरांचे लक्ष लागले आहे.

जामखेडची कचरा व्यवस्था कोलमडली चार घंटा गाड्या धुळखात पडून; निविदा चार महिन्यांपासून रखडली

४० हजार नागरिकांच्या आरोग्याशी खेळ, शिवप्रतिष्ठान हिंदुस्तनचा नगरपरिषदेला सात दिवसांचा अल्टिमेट

लोकनायक वृत्तसेवा –
जामखेड शहरातील कचरा व्यवस्थापनाची व्यवस्था पूर्णपणे कोलमोडली असून, शहरातील कचऱ्याचे ढीग दुर्गंधी आणि डासांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर निर्माण झाला आहे. शहराच्या स्वच्छतेसाठी पूर्वी कार्यरत असलेल्या आठ घंटा गाड्यांपैकी केवळ चार गाड्या सुरू असून उर्वरित चार गाड्या नगरपरिषद आवारात गेल्या अनेक महिन्यांपासून धुळखात पडून आहेत. त्यातच कचरा संकलनाची निविदा प्रक्रिया चार महिन्यांपासून रखडल्याने शहराच्या स्वच्छतेचा बोजवारा उडाला आहे. या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन कचरा व्यवस्थापना पूर्वत करावे अशी मागणी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान जामखेड तालुक्याच्या वतीने नगराध्यक्षा व मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. अध्यक्ष पांडुरंग मधुकर भोसले यांनी प्रशासनाला सात दिवसाचा अल्टिमेट दिला आहे. ४० हजार लोकसंख्येसाठी फक्त चार घंटा गाड्या!

जामखेड शहराची लोकसंख्या सुमारे ४०,००० असून शहरात १२ प्रभाग आहेत एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात कचरा संकलनासाठी केवळ चार घंटा गाड्या कार्यरत असल्याने संपूर्ण शहराची स्वच्छता करणे अशक्यप्रय बनले आहे नगरपरिषद आवारात बंद अवस्थेत उभे असलेल्या चार घंटा गाड्यांची दुरुस्ती करून त्या तातडीने सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.



चार महिन्यांपासून निविदा रखडली; स्वच्छतेचा बोजवारा
कचरा संकलनाची निविदा प्रक्रिया गेल्या चार महिन्यांपासून प्रलंबित आहे सध्या नगर परिषदेचे कर्मचारी उपलब्ध मनुष्यबळाच्या आधारे कचरा संकलन करत असले तरी कर्मचारी अपुरे असल्याने शहरातील सर्व प्रभागात नियमित स्वच्छता होत नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मुख्य रस्ते, चौक, बाजारपेठ आणि विविध प्रभागांमध्ये कचऱ्याचे ढीग साचत असून नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे.
डेंगू मलेरिया च धोका; नागरिकांचे आरोग्य धोक्यात
कचरा वेळेवर उचलला जात नसल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती व्यक्त होत आहे यामुळे डेंगू मलेरिया यासारख्या आजारांचा धोका निर्माण होऊ शकतो शहराच्या स्वच्छतेसाठी नागरिकांकडून नियमित स्वच्छता कर वसूल केला जात असताना मूलभूत स्वच्छता सुविधाच उपलब्ध होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. बंद पडलेल्या घंटागाड्यांची योग्य देखभाल व सुरक्षा नसल्याने त्यांच्या सुट्ट्या भागांचे नुकसान किंवा चोरी होण्याची शक्यता ही निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने उपयोजना कराव्यात अशी मागणी करण्यात आली आहे. शेप्रतिष्ठांच सहा प्रमुख मागण्या श्री प्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने प्रशासनाकडे पुढील मागण्या करण्यात आले आहे.बंद पडलेल्या चार घंटागाड्यांची युद्ध पातळीवर दुरुस्ती करून सात दिवसात कार्यान्वित कराव्यात कचरा संकलनाची रखडलेली निविदा प्रक्रिया तातडीने पूर्ण करून कंत्राट सुरू करावे. वाढती लोकसंख्या व १२ प्रभाग लक्षात घेऊन नवीन घंटागाड्या खरेदीचा प्रस्ताव स्वच्छ भारत मिशन (शहरी २.०) आणि १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवावा प्रत्येक प्रभागातून दररोज कचरा उचलण्यासाठी लेखी वेळापत्रक जाहीर करावे.
बंद घंटा गाड्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी निश्चित करून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान टाळावे. शहराच्या विस्तारानुसार स्वच्छता अभियानासाठी अतिरिक्त कर्मचारी उपलब्ध करून द्यावीत. सात दिवसात कारवाई करा अन्यथा आंदोलन! जामखेड शहरातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न हा केवळ स्वच्छतेपुरता मर्यादित नसून नागरिकांच्या आरोग्याशी निगडित असल्याचे निवेदना स्पष्ट करण्यात आले आहे येत्या सात दिवसांत ठोसा आणि प्रत्यक्ष दिसणारी कारवाई न झाल्यास जामखेडकरांच्या हितासाठी तीर लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराध्यक्ष पांडुरंग मधुकर भोसले यांनी दिला आहे. आता नगरपरिषद प्रशासन या गंभीर प्रश्नावर किती तत्परतेने कार्यवाही करते आणि जामखेडकरांना कचऱ्याच्या समस्येतून कधी दिलासा मिळतो याकडे शहरवासी यांचे लक्ष लागले आहेत.

संविधान दिनानिमित्त सनराईजब शैक्षणिक संकुलात कायदेविषयक जनजागृती शिबिर उत्साहात!

लोकनायक वृत्तसेवा –
संविधान दिनानिमित्त २६ नोव्हेंबर रोजी सनराईजब मेडिकल अँड एज्युकेशन फाउंडेशन, जामखेड अंतर्गत शैक्षणिक संकुलात जामखेड तालुका विधी सेवा समिती व जामखेड वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक जनजागृती शिबिर उत्साहात पार पडले.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव तथा प्राचार्या अस्मिता जोगदंड (भोरे) होत्या. यावेळी ॲड. पी. के. राऊत, ॲड. संग्राम पोले व ॲड. पी. जे. थोरात यांनी विद्यार्थ्यांना बालहक्क, झजउडज कायदा, बालविवाह प्रतिबंधक कायदा, मोफत कायदेशीर मदत तसेच सायबर सुरक्षेविषयी मार्गदर्शन केले.
संस्थेचे संचालक प्रा. तेजस भोरे यांनी संविधानातील हक्क, कर्तव्ये व कायदेविषयक जागरूकतेचे महत्त्व विशद केले. नाना काटे (झडत) यांच्यासह संस्थेच्या साहेबराव पाटील माध्यमिक विद्यालय व स्व. एम. ई. भोरे ज्युनिअर कॉलेज, स्व. विठ्ठलराव भोगाल



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुनील घाडगे यांनी केले, तर चंद्रकांत सातपुते यांनी आभार मानले.
यावेळी वकील संघाचे सचिव ॲड. एस. ए. लटपटे, दत्तात्रय काळोबा माध्यमिक विद्यालय, कुसडगाव, सनराईजब इंग्लिश स्कूल या सर्व शैक्षणिक शाखांतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भोकरदन येथे भारतीय संविधान दीन उत्साहात साजरा

लोकनायक वृत्तसेवा –
भोकरदन येथे संविधानाचे जनक विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान देशाला अर्पण करून तब्बल ७५ वर्षांपेक्षा जास्त कालावधी लोटला आहे. तो दिवस देशभरात संविधान दीन म्हणून मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येतो त्याचाच एक भाग म्हणून भोकरदन शहरातही भारतीय संविधान गौरव दीन संयोजन समितीच्या वतीने विविध घेऊन कार्यक्रमाच्या माध्यमातून संविधान दीन मोठ्या उत्साहात साजरा केला.
सकाळी रमाई नगर येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला समितीच्या वतीने नगरसेवक दीपक मोरे, रणवीरसिंह देशमुख, माजी नगरसेवक दीपक बोर्डे, पत्रकार विजय सोनवणे,सामाजिक कार्यकर्ते प्रदीप जोगदंडे, सचिन पारखे, नारायण जिवरग यांच्यासह संयोजन समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पुष्पहार घालून अभिवादन करून संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.



त्यानंतर बसस्थानकासमोरील छत्रपती शिवाजी महाराजांना समितीच्या वतीने अभिवादन करण्यात आले व शेवटी सिल्लोड कॉर्नरवरील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन तसेच संविधान उद्देशिकेचे वाचन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.
यावेळी नगरसेवक मुकेश चिने, ॲड डी एस जाधव, केशव जंजाळ, शंकर सपकाळ, सुरेश बनकर, युवराज पगारे, कमलकिशोर जोगदंडे, प्रभाकर दादा बोर्डे,चंद्रकांत पगारे, गणेश औटी,बबन शिंदे, दीपक तळेकर, डॉ प्रभू बोर्डे, रतन दाभाडे,रमण पगारे, प्रवीण आढावे, रमेश बिरारे यांच्यासह बहुसंख्य संविधानप्रेमी नागरिक उपस्थित होते.

आष्टीत पाणीटंचाईने नागरिक त्रस्त; ग्रामसेवकाच्या खुर्चीला दिले निवेदन

आठ दिवसांत पाणीपुरवठा सुरू न केल्यास आंदोलनाचा इशारा

लोकनायक वृत्तसेवा –
येथे सध्या पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर होत चालली आहे. नियमित नळाद्वारे पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पाणीटंचाईच्या समस्येने त्रस्त झालेल्या नागरिकांनी शुक्रवारी आपल्या मागण्यांसाठी ग्रामपंचायत कार्यालय गाठले. ग्रामसेवक व सरपंच यांच्या नावे निवेदन देण्यासाठी नागरिक कार्यालयात पोहोचले; मात्र यावेळी ग्रामसेवक कार्यालयात उपस्थित नसल्याने नागरिकांनी चक्क त्यांच्या रिकाम्या खुर्चीलाच निवेदन देत आपला संताप व्यक्त केला.
ग्रामपंचायतीकडून पुरेसा पाणीपुरवठा केला जात नसल्यामुळे विविध वस्त्यांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. अनेक भागांत अद्याप पाईपलाईनची सुविधा उपलब्ध नसल्याने महिलांना दूरवरून पाणी आणावे लागत आहे. तीव्र पाणीटंचाईमुळे नागरिकांचे दैनंदिन जनजीवन तसेच घरगुती कामकाज विस्कळीत झाले आहे. असे असतानाही ग्रामपंचायत प्रशासनाकडून या समस्येवर ठोस उपाययोजना केल्या जात नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.निवेदनाद्वारे आष्टी शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. ज्या वस्त्यांमध्ये पाईपलाईनची सुविधा उपलब्ध नाही, त्या ठिकाणी पाईपलाईन टाकून नियमित पाणीपुरवठ्याची व्यवस्था करावी, तसेच पाणीटंचाईने त्रस्त नागरिकांना तातडीने दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.ग्रामपंचायत प्रशासनाला नागरिकांनी आठ दिवसांची मुदत दिली असून, या कालावधीत पाणीपुरवठ्याची समस्या सोडवून नियमित पाणीपुरवठा सुरू न केल्यास ग्रामपंचायतीविरोधात आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.या निवेदनावर गौतम शेळके, शिवाअप्पा खिस्ते, पवन आव्हाड, शेटे, संतोष रोहिमल, दीपक दवंडे, अलीममियाँ चाऊस, नदीम शेख, भारत मोरे, गणेश वैद्य, तौफीक शेख, विशाल शिंदे आदींची नावे व स्वाक्षऱ्या आहेत.ग्रामसेवकाच्या अनुपस्थितीत त्यांच्या खुर्चीला निवेदन देण्याच्या घटनेमुळे ग्रामपंचायत
प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता नागरिकांच्या या इशाऱ्यानंतर ग्रामपंचायत प्रशासन पाणीटंचाई दूर करण्यासाठी कोणती ठोस पावले उचलते, याकडे आष्टीकरांचे लक्ष लागले आहे.



मराठवाडा एसटी कर्मचारी पतसंस्थेच्या संचालक पदी एम.डी.कड यांची बिनविरोध निवड

लोकनायक वृत्तसेवा
भोकरदन मराठवाडा सीसीएस एसटी कर्मचारी पतसंस्थेचे मुख्य कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाड्यातील सर्व संचालकांच्या व श्री पि टी कर्वे यांच्या उपस्थितीत निवडणूक पार पडली. त्यात श्री गणेश चव्हाण विभागीय सचिव बीड यांनी श्री एम. डी. कड यांचे नाव संचालक पदासाठी सुचवले व त्यास श्री लव्हारे यांनी अनुमोदन दिले. श्री एम.डी. कड यांचा एकमेव उमेदवारी अर्ज प्राप्त झाल्याने त्यांची मराठवाडा एसटी कर्मचारी पतसंस्थेच्या संचालक पदी बिनविरोध निवड झाली अशी घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी माननीय श्री मातेरे जिल्हा उपनिबंधक तथा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी घोषणा केली.



या प्रसंगी एसटी कामगार संघटनेचे प्रादेशिक सचिव श्री बाबासाहेब सोळंके जालना विभागीय सचिव व सीसीएस बँकेचे सेक्रेटरी श्री पि टी कर्वे तसेच बीड, परभणी, नांदेड, लातूर ,धाराशिव, जालना, छत्रपती संभाजीनगर व हिंगोली या सर्व विभागांचे विभागीय

loknayak 28.11.2026:Copy of Layout 1 11/27/2026 11:08 PM Page 4

नगरपंचायतीच्या अत्याधुनिक टोलेजंग इमारतीने वडवणीच्या विकासाला नविन साज

लोकनायक वृत्तसेवा –
वडवणी शहराच्या विकासप्रवासात मानाचा तुरा रोवणारा आणि नगरपंचायतीच्या प्रशासकीय वाटचालीला नवी दिशा देणारा महत्त्वपूर्ण क्षण आता जवळ आला आहे. तब्बल ६ कोटी ३० लाख रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या वडवणी नगरपंचायतीच्या भव्य व नूतन प्रशासकीय इमारतीचा उदघाटन सोहळा विविध मान्यवरांच्या उपस्थितीत आज रोजी सकाळी ११ वाजता संपन्न होणार आहे. महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या माध्यमातून उपलब्ध झालेला निधी, माजलगांव विधानसभा मतदारसंघाचे विकासप्रिय आमदार प्रकाशदादा सोळंके यांचे प्रयत्न आणि शेषेराव बाप्पु जगताप यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे साकारलेल्या व शहराच्या वैभवात मैलाचा दगड ठरेल अशा या नेत्रदिपक अशा प्रशासकीय वास्तूचे लोकार्पण आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या शुभहस्ते होणार आहे. त्यामुळे वडवणी शहराच्या विकासाच्या इतिहासात हा सोहळा एक महत्त्वपूर्ण पर्व ठरणार आहे. वडवणी नगरपंचायतीच्या नूतन प्रशासकीय इमारतीच्या उभारणीसाठी सुरुवातीला दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या माध्यमातून आणि आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या विशेष प्रयत्नांतून तब्बल ५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला होता. या निधीमुळे इमारतीच्या बांधकामाला गती मिळाली. मात्र, प्रशासकीय इमारतीचे उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी आणखी निधीची आवश्यकता निर्माण झाली होती. ही बाब लक्षात घेवून नगरपंचायतीचे माजी गटनेते शेषेराव बाप्पु जगताप यांनी अतिरिक्त निधीसाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या मागणीची दखल घेत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून आणखी १ कोटी ३० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला.



अशा प्रकारे एकूण ६ कोटी ३० लाख रुपयांच्या भरीव निधीतून वडवणी नगरपंचायतीची ही भव्य, आकर्षक आणि सुसज्ज प्रशासकीय इमारत उभी राहिली आहे. केवळ एक प्रशासकीय इमारत म्हणून नव्हे, तर शहराच्या विकासाची दूरदृष्टी, लोकप्रतिनिधींचे प्रयत्न आणि स्थानिक पातळीवरील पाठपुराव्याचे फलित म्हणून या वास्तूकडे पाहिले जात आहे. अनेक वर्षांपासून अपेक्षित असलेल्या सुसज्ज प्रशासकीय सुविधांना या इमारतीच्या माध्यमातून नवे बळ मिळणार आहे. या उदघाटन सोहळ्याचे उदघाटक म्हणून माजी मंत्री तथा माजलगांव विधानसभा मतदारसंघाचे विकास प्रिय आमदार प्रकाशदादा सोळंके उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे विशेष अतिथी म्हणून बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन उपस्थित राहणार असून, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वडवणीच्या नगराध्यक्षा वंदनाताई शेषेराव जगताप असणार आहेत. व प्रमुख उपस्थितीमध्ये नगरपंचायत प्रशासन बीडचे सहाय्यक आयुक्त संभाजी वाघमारे यांची उपस्थिती राहणार आहे. याशिवाय माजी जिल्हा परिषद सभापती जयसिंग भैय्या सोळंके, माजी नगराध्यक्ष राजाभाऊ आण्णा मुंडे, माजलगांवचे नगराध्यक्ष सहाल भैय्या चाऊस, धारुरचे नगराध्यक्ष बालासाहेब जाधव, कृषी उत्पन्न बाजार समिती वडवणीचे सभापती संभाजी शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बजरंग साबळे, उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, माजी जिल्हा परिषद सदस्य सर्जेराव आळणे, माजी जिल्हा परिषद सदस्य नवनाथराव म्हेत्रे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विकास मुंडे, ज्येष्ठ नेते अंकुशराव शिंदे, गटनेते तथा सभापती अस्लम भैय्या कुरेशी, माजी सरपंच गंपूशेठ पवार, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे तालुकाध्यक्ष महादेवदादा **पान २ वर**

ॲड.प्रकाश आंबेडकर यांच्या उपस्थितीत ३० नोव्हेंबर रोजी केज येथे होणार मराठवाडा विभागीय शेतकरी निर्धार बैठक!

शेती प्रश्नावर काम करणाऱ्या प्रतिनिधींनी उपस्थित रहावे –भाई मोहन गुंड

लोकनायक वृत्तसेवा –
राज्यातील शेतकरी, शेतमजूर आणि कामगारांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करून त्यांच्या मागण्यांना शासन दरबारी वाचा फोडण्यासाठी सोमवार, दिनांक ३० नोव्हेंबर रोजी १२ वाजता प्रमुख मार्गदर्शक ॲड. बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर, यांच्या प्रमुख उपस्थितीत व भाई बाबासाहेब देवकर यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत केज येथील मुक्ताई फंक्शन हॉलमध्ये महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे.
सध्या शेतकरी विविध नैसर्गिक आणि आर्थिक संकटांचा सामना करीत आहेत. शेतीमालाला योग्य भाव मिळणे, पाण्याचे समन्यायी वाटप, दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत, वीज बिल माफी तसेच शेतमजूर आणि कामगारांच्या आर्थिक प्रश्नांसह विविध मागण्यांवर या बैठकीत चर्चा होणार आहे.
या बैठकीत प्रामुख्याने कापूस आयातीवर २० टक्के आयात शुल्क लागू करावे, महाराष्ट्रातील पाण्याचे सर्व विभागांना समन्यायी पद्धतीने पाणी वाटप करावे, शेतकऱ्यांना केवळ पाच हजार रुपयांची मदत न देता हेक्टरी ५० हजार रुपये आर्थिक मदत द्यावी, शेतमजूर व कामगारांना प्रत्येकी ३० हजार रुपये आर्थिक मदत द्यावी, दुष्काळजन्य परिस्थीती पहाता शेतीपंपांचे आणि नागरिकांचे घरगुती वीजबिल माफ करावे, जनतेला नको असलेला शक्तिपीठ महामार्ग रद्द करून त्या भागातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, तसेच दुष्काळजन्य परिस्थितीत जनावरांसाठी तातडीने चारा व पाण्याची व्यवस्था करावी, या प्रमुख मागण्यांवरही विचारविनिमय होणार आहे.
या बैठकीस बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यातील शेती प्रश्नावर काम करणारे नेते पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, बैठकीनंतर ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांची पत्रकार परिषद होणार असून, यामध्ये शेतकरी, शेतमजूर आणि कामगारांच्या प्रश्नांवर त्यांची भूमिका स्पष्ट होणार आहे. या महत्त्वपूर्ण शेतकरी निर्धार बैठकीचे आयोजन शेतकरी कामगार पक्षाचे राज्य चिटणीस मंडळ सदस्य भाई मोहन गुंड यांनी केले असून, मराठवाड्यातील शेती प्रश्नावर काम करणाऱ्या सर्व समविचारी शेतकरी प्रतिनिधींनी या बैठकीला उपस्थित रहाण्याचे आवाहन केले आहे.

डिघोळआंबा शिवारात अनोळखी व्यक्तीचा निघृण खून; पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह जाळण्याचा प्रयत्न!

मृतदेहाची ओळख पटविण्याचे पोलिसांचे आवाहन

लोकनायक वृत्तसेवा
केज तालुक्यातील युसुफवडगाव पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या डिघोळआंबा शिवारात एका अनोळखी व्यक्तीच्या डोक्यात दगड घालून निघृण खून करण्यात आल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. या घटनेचा पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने अज्ञात मारेकऱ्यांनी मृतदेह जाळून टाकण्याचा प्रयत्नही केल्याचेही समोर आले आहे.
दिनांक २५ नोव्हेंबर २०२६ रोजी केज तालुक्यातील डिघोळआंबा शिवारातील कानडी बदनकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या एका जुन्या तलावात हा मृतदेह स्थानिकांना आढळून आला. या



घटनेची माहिती मिळताच युसुफवडगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे व पोलीस कॉन्स्टेबल धनंजय कारले यांनी सहकाऱ्यांसह तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. अज्ञात हल्लेखोरांनी या व्यक्तीच्या डोक्यात दगड घालून हत्या केल्यानंतर ओळख पटू नये. म्हणून प्रेत पेटवून देण्याचा प्रयत्न केला, मात्र ते अर्धवट अवस्थेत जळाले आहे.
मृतदेहाची ओळख पटविण्याचे पोलिसांचे आवाहन
घटनास्थळी आढळलेला मृतदेह हा ५० ते ५५ वर्षे वयोगटातील पुरुषाचा आहे. मयताच्या अंगात पांढऱ्या रंगाचा फाटलेला व अर्धवट जळालेला सदरा असून, करड्या रंगाची काळे-पिवळे पट्टे आणि लाल **पान २ वर**

हॉटेल
जय महाराष्ट्र
शिवाजीनगर, बार्शी रोड, बीड
शाकाहारी व मांसाहारी उत्तमरित्या जेवण मिळण्याचे एकमेव ठिकाण
प्रो.नयनाथ शिंदाळे
मो.नं. ९४२२२४००६५
९८२२०७५९४५

प्रो.प्रा. सुजीत गुंजाळ 9975025031
॥ तुळजाभवानी प्रसन्न ॥
प्रो.प्रा.अभिजीत गायकवाड 9852551818
आम्ही घडवतो एक रंगित विश्व...!
सत्यम
ग्रा फि क्स
बॅनर प्रिंटींग
स्टार प्रिंटींग
वनवे प्रिंटींग
विनायल प्रिंटींग
बॅक लाईट
१२ X १८ स्टिकर
सर्व प्रकारची डिझायनिंग व प्रिंटींग
सत्यम ग्राफिक्स,बीड.
satyamgraphics80@gmail.com 9975025031 / 9852551818 संत सावता माळी चौक, बीड.

प्रोप्रा.नरेंद्र करमाळकर
मो.नं.९४२०७९८९२९
निलेश करमाळकर
मो.नं.९८२२४४८८५२
न्यु करमाळकर
Since1999
G.S.T.N. No.27BKAPK8972L2ZI
ज्वेलर्स
बुंदलेपुरा, अग्नीशामक रोड, बीड ४३११२२

ट्रॅक्टर-मोटारसायकल अपघातात मोटार सायकल स्वार फ्रॅक्चर ;२वर्षीय बालक किरकोळ जखमी

लोकनायक वृत्तसेवा –
राष्ट्रीय महामार्ग-६१ वरील माजलगाव तालुक्यातील माजलगाव –गढी मार्गावर असलेल्या तालखेड पाटीवरील जवळ अनुष्का हॉटेल ट्रॅक्टर व मोटार सायकल च्या अपघातात मोटार सायकल स्वार फ्रॅक्चर झाला तर सोबत असलेल्या २वर्षीय बालक जखमी झाल्याची घटना २६नोव्हेंबर रोजी घडल्याने रस्ता सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.
या अपघाता विषयी समजलेल्या माहितीनुसार माजलगाव तालुक्यातील मालीपारगाव येथील युवक नामे सय्यद नासेफ हनीफ (२६वर्षे)व त्याच्या सोबत सय्यद रशीद (२वर्षे) हे मोटार सायकलवरून उल्लेखीत ठिकाणाहून प्रवास करत असताना त्यांच्या मोटारसायकल ला गढी मार्गाने जाणाऱ्या एका अज्ञात ट्रॅक्टरने समोरासमोर धडक दिली.
यात मोटार सायकल स्वार नासेफ हनीफ च्या पायास गंभीर दुखापत झाली तर २वर्षांचा बालक किरकोळ जखमी झाल्याने तेथे उपस्थित लोकांनी उपचारासाठी माजलगाव शहरातील संजीवनी हॉस्पिटल मध्ये दाखल केले होते.
तेथील डॉक्टरांनी तपासणी करून नासेफ च्या पायास गंभीर फ्रॅक्चर झाल्याचे सांगुन पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजी नगर येथे हलविण्याचा सल्ला दिला तर बालकाची प्रकृती स्थिर असल्याने त्यास पालकांच्या स्वाधीन केले, दरम्यान यातील ट्रॅक्टर चालक पसार झाला असून पोलीस त्याचा तपास करीत आहेत.

आमदार प्रतापसिंह पाटील यांची आदित्य जेंट्स पार्लरला सदिच्छा भेट

लोकनायक वृत्तसेवा –
पदवीधर मतदारसंघाचे आमदार प्रतापसिंह पाटील यांनी आदित्य जेंट्स पार्लरला सदिच्छा भेट देऊन उपस्थितांशी संवाद साधला. या भेटीप्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर व मित्रपरिवाराची उपस्थिती लाभली.
यावेळी शरदचंद्र पवार गटाचे तालुकाध्यक्ष राजेंद्र भैय्या मोटे, आरोग्यवर्धिनी वेलनेस ॲंड फिटनेस सेंटरचे प्रमुख तथा वरिष्ठ जागतिक आरोग्य सल्लागार राम कदम, आदित्य जेंट्स पार्लरचे प्रमुख दशरथ पंडित, राजू पंडित, युवराज राऊत यांच्यासह मित्रपरिवार उपस्थित होता.



या सदिच्छा भेटीच्या निमित्ताने उपस्थितांमध्ये आपुलकीपूर्ण संवाद, स्नेहभाव आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. आमदार प्रतापसिंह पाटील यांच्या भेटीने आदित्य

भारतीय संविधान एकता,समता, बंधुता व न्यायाचे प्रतिक आहे:राजू जोगदंड

रिपाइंच्या वतीने कुमशी गांवी संविधान दिन साजरा

लोकनायक वृत्तसेवा –
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून या देशातील समाज बांधवांना दिलेले मूलभूत अधिकार, लोकशाहीची मूल्ये, न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचे काम आगामी काळात रिपाइं कार्यकर्त्यांनी करावे असे आवाहन रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड यांनी बीड तालुक्यातील कुमशी या गावी संविधान दिनाचे औचित्य साधून केले.भारतीय



संविधानाने या देशातील तमाम शोषित, पीडित, वंचित उपेक्षितांना आपल्या न्याय व हक्कासाठी मूलभूत अधिकार मिळवून दिले आहेत. त्यामुळे देशात आज सामाजिक न्याय, लोकशाही, समता, स्वातंत्र्य, बंधुता टिकून आहे. आगामी काळात रिपाइं कार्यकर्त्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानिक अधिकारांची ताकद व संविधानाची प्रेरणा घेऊन संविधानिक विचा र पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम करावे. असे आवाहन रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड यांनी केले. **पान २ वर**

डॉ.श्रेया कांबळे यांना एफ.एम.जी.ई.परिक्षेत पहिल्याच प्रयत्नात घवघवीत यश!

लोकनायक वृत्तसेवा –
शिक्षण क्षेत्रामध्ये कोणत्याही अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्याला जिद्द, चिकाटी आणि शिक्षणाची आवड असणे गरजेचे असते. तर त्या विद्यार्थ्याला शिक्षण देण्यासाठी आई वडीलांचा आपल्या पाल्ल्यावर प्रथमतः विश्वास असणे गरजेचे असते.त्याच बरोबर घरातील कौटुंबिक वातावरण, सक्षम आर्थिक बाजू , अशा अनेक गोष्टी असल्याशिवाय मुलांना उच्च शिक्षण घेता येत नाही. बुद्धी तर सर्वांना सारखीच असते मात्र बुद्धीमधील जो बुद्धयांक असतो तो प्रत्येकाचा वेगवेगळा असतो. बुद्धी म्हणजे



काय? याचे थोडक्यात स्पष्टीकरण असे की एखाद्या व्यक्तीची विचार करण्याची , समजण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता म्हणजे बुद्धी होय.तर बुध्द्यांक म्हणजे एखाद्या व्यक्तीची विचारशक्ती, तर्कशक्ती, स्मरणशक्ती, समस्या सोडवण्याची क्षमता, आणि इतर काही मानसिक कौशल्यांचे प्रमाणिक चाचण्याद्वारे केलेले मोजमाप म्हणजे बुद्धयांक होय.अशा हुशार असणाऱ्या विद्यार्थ्यांनीनी आपल्या बुध्दीची कसोटी लावुन घवघवीत यश संपादन केले आहे. अशाच एका कांबळे या सर्वसामान्य कुटुंबातील त्यांची मुलगी डॉ.श्रेया हिने **पान २ वर**

07This newspaper printed by owner printer publisher editor Bharat Devdas Gaikwad chief editors Abhijeet Gaikwad at indradhanush printers and publishers near post office paid bid Kharagpur Beed 431122 Maharashtra and published at the office of Dainik loknayak near Kharagpura beed 431122 Maharashtra

हे पत्रक मालक मुद्रक प्रकाशक संपादक भारत देविदास गायकवाड कार्यकारी संपादक अभिजीत गायकवाड यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स अँड पब्लिशर्स पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे छापून दैनिक बीडचा लोकनायक कार्यालय पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले निवासी संपादिका नायरा राज मुळे पी आर बी कायद्यानुसार सर्व वादविवाद बीड न्याय कक्षेत मोबाईल नंबर ९८ ५० १६ ५० ८२ / ९४ २० ४०६०१९ email- dainikloknayak@gmail.com